जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२२/०१/२०२४
## दि.२१/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ०९/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२५ वर्षे,रा.गणेशनगर,एरवंडणे,पुणे |
| **आरोपीत** | कार मधील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०१/२०२४ रोजी ०३/०० वा.श्री.स्वामी समर्थ मठा समोर रामेश्वर चौक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्राची वाट पाहत नमुद ठिकाणी उभे असताना,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना हाताने मारहाण करुन,त्यांचे जवळील २२,०००/- रुपये किचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बरुरे ८३२९०८९६५१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २२/२०२४,भादविक ३२३,३२६,५०४,५०६,३४,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),महा.पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन मुलगा,वय-१७ वर्ष,रा.संभाजीनगर,धनकवडी,पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०१/२०२४ रोजी रात्रौ २२/०० वा.हनुमान मंदिरा जवळ,संभाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दि.१९/०१/२०२४ रोजी त्यांचे मित्रासोबत मित्र अनिकेत कर्के याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी जात असताना,यातील नमुद इसमांनी रस्त्यात आडवे होवुन, फिर्यादी यांचेकडे रागाने बघत असताना,त्यांना जाब विचारल्याचे कारणावरून,त्यांचेमध्ये शाब्दिक वाद झाला होता. त्यानंतर दि.२०/०१/२०२४ रोजी फिर्यादी हे त्यांचे मित्रासोबत संभाजीनगर येथे सजावटीचे पताके लावत असताना,सदर इसमांनी आपसात संगनमत करून, त्यांचे हातात धारधार हत्यार घेवुन येवुन,त्यांनी भांडणे मिटवण्याचे कारणावरून फिर्यादी यांना हाताने मारहाण करून,त्यांचे पाठीमागुन कोयत्याने वार करून दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. युवराज पोठरे ९८२२९८६२६२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३९/२०२४,भादविक ३९४,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-५७ वर्षे,रा.काळेपडळ,हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०१/२०२४ रोजी रात्री ११/०० वा. गुडलक हेअर सलुन दुकाना समोरील रोडवर,काळे पडळ,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे कामावरुन सुटल्यानंतर त्यांचे राहते घरी पायी जात असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे समोर येवुन,त्यांना पैशाची मागणी केली. त्यावेळी फिर्यादी यांनी माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगीतले असता,त्यांनी जबरदस्तीने फिर्यादी यांचे शर्टाचे खिशात हात घालुन,पुन्हा पैसे काढ असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन त्यांना जखमी केले आहे

**त.अंमलदार** सहा.पो.निरीक्षक, अर्जुन कुदळे ९५५२५९१०९६

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** डेक्कन पो स्टे ११/२०२४,भादविक ३७९,५०६,३४

**फिर्यादी** नौमान पठाण,वय २८ वर्ष,रा.गोखलेनगर,पुणे

**आरोपीत** मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२१/१/२०२४ रोजी दु.१३/३० वा.एफ.सी.रोड ओरोलिया कापड दुकानाचे समोरील रोडवर डेक्कन,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे कापड दुकानात जात असताना,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे जवळ येऊन,त्यातील एका इसमाने फिर्यादी यांचे पाया पडण्याचा बहाणा करून,फिर्यादी यांचे पॅन्टचे पाठीमागील खिशातील पाकीटा मधील १८,०००/- रूपये रोख रक्कम पाकीटासह चोरी करून नेले आहे.

**त.अंमलदार** पोलीस अंमलदार, शिरसाठ ९६८९००२५६८

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ७५/२०२४,भादविक ३९९,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५)

**फिर्यादी** लक्ष्मण होळकर, पोलीस अंमलदार, कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

**आरोपीत** अनंत अनिल खोले,वय-२२ वर्षे,रा.संतोषनगर,कात्रज,पुणे (अटक) व इतर दोन विधीसंघर्षीत बालक (जखमी आहेत) व इतर तीन

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २१/०१/२०२४ रोजी रात्रौ.०३/१५ वा. च्या सुमारास टेबल पॉईन्ट,बोपदेव घाट,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे एक लोखंडी कोयता,मिरची पुड तसेच दोन मोटार सायकल इत्यादि बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टाकण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,टेबल पॉईन्ट,बोपदेव घाट,पुणे येथे येणारे-जाणारे वाहनांवर दरोडा टाकण्याचे उद्देशाने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना आ.क्र.१ हा मिळुन आला आहे. तसेच आ.क्र.१ व इतर दोन विधीसंघर्षीत बालक हे गुन्हा घडल्यानंतर पळुन जाताना,त्यांची मोपेड स्लिप होवुन रोडवर पडल्याने ते त्यामध्ये जखमी झाले आहेत.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, लेखाजी शिंदे ९४२०००१९९५

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** स्वारगेट पो स्टे २४/२०२४,भादविक ३७९

**फिर्यादी** सुरेश शिंदे,वय-५७ वर्ष,रा.चिखली,पिपरी-चिंचवड,पुणे

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक २१/०१/२०२४ रोजी सकाळी १०/४५ वा. स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड,पुणे येथुन कराडला जाण्यासाठी एस.टी. बस मध्ये चढत असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन १,१०,०००/- रू किंची चोरी करून नेली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. अशोक पाटील ७३५०६२६२०५

**७**

**पो.स्टे.गुरनं./कलम** मुंढवा पो स्टे २८/२०२४,भादविक ३७९,३४

**फिर्यादी** एक महिला,वय-७० वर्षे,रा,पिंगळे वस्ती,मुंढवा,पुणे

| | |
|---|---|
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०१/२०२४ रोजी ११/३० वा.मुंढवा,पिंगळे वस्ती,गंगा टेरीस जवळील अर्थकला आर्कीटेक्चर या बंद असलेल्या ऑफीसचे समोरील कट्टयावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे गळयातील सोन्याची पोत दुरूस्ती करावयाची असल्याने,त्यांचे जवळील कापडी पिशवी मध्ये एका कापडात गुंडाळुन सोनाराच्या दुकानकडे जात असताना, गंगा टेरेस सोसायटीचा जीना उतरुन खाली येत असताना,त्यांना थकवा आल्यामुळे नमुद ठिकाणी असलेल्या ऑफीसचे समोरील कट्टयावर बसले असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे समोर रिकाम्या कट्टयावर बसुन,त्यांचे सोबत गप्पा मारण्याचा बहाणा करून,मावशी तुमची पिशवी खाली पडली आहे ही घ्या आणि व्यवस्थीतीत ठेवा असे बोलुन,त्यांची पिशवी फिर्यादी यांचे हातात देण्याचे बहाण्याने हातचलाखीने फिर्यादी यांचे जवळील ३०,०००/- रुपये किंचे सोन्याचे दागिने पिशवी मधुन काढुन चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, शिवरकर ९९२३४५५५७७ |

## दि.२२/०१/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ४३/२०२४,भादविक ३०७,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९,५०४,५०६,महा.पो.का. क.३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | रोहीत गोरखे,वय-२३,रा.जनता वसाहत,पर्वती,पुणे |
| **आरोपीत** | एकुण १० इसम व त्यांचे इतर ३ ते ४ साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०१/२०२४ रोजी १५/३० वा. गल्ली नं.७३,वरचा टप्पा,जनता वसाहत,पर्वती,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र पवन कोळी याचेसह जात असताना,फिर्यादी यांचे मित्राचा भाऊ शंकर काकडे यांना काही मुले मारहाण करीत होते म्हणून फिर्यादी हे त्यांचे मदतीला गेले असता,सदर इसम व त्यांचे इतर साथीदार यांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन,फिर्यादी व पवन यांना शिवीगाळ करुन,लाथा-बुक्यांनी मारहाण करून,त्यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे डोक्यात तसेच पवन कोळी याचे डोक्यात लाकडी स्टम्पने,लोखंडी रॉडने,लाकडी बांबु व दगडाने मारहाण करून जखमी केले. त्यानंतर फिर्यादी यांचे मदतीला आलेल्या वस्तीतील नागरीकांना धमकावुन पळवुन लावुन दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जी.डी.घावटे ०२०/२४२२०२०५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**